|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

*(Research Section)*

जा.क्र. कबचौउमवि/11/संशोधन विभाग/९४८/२०२२ दिनांक: ०१/०६/२०२३

## परिपत्रक

विषय: दिव्यांगत्व विषयक संशोधन प्रकल्पासाठी / दिव्यांगत्व विषयावर संशोधन करण्याकरीता दिव्यांग समितीची पुर्व परवानगी घेणेबाबत

संदर्भ: दिव्यांग कल्याण आयुक्तालय , ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य , पुणे यांचे दि. ०९/०३/२०२३ चे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे मान्यताप्राप्त संशोधक मार्गदर्शक तसेच संशोधक विद्यार्थी यांना कळविण्यात येते कि, दिव्यांगत्व विषयावर वा दिव्यांगत्व विषयाशी निगडीत संशोधन प्रकल्पावर, संशोधन करावयाचे असल्यास संदर्भिय पत्रात नमुद केल्याप्रमाणे मा. आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तशी परवानगी न घेतल्यास त्यांचा संशोधन कार्याचे शिर्षक व आराखडा मान्य होणार नाही.

आदेशान्वये

(वि. व. तळेले)
उपकुलसचिव (संशोधन)

प्रती

१. मा.संचालक/मा.विभागप्रमुख, विद्यापीठातील शैक्षणिक प्रशाळा/विभागप्रमुख, कबचौउमवि, जळगाव.
२. मा.प्राचार्य/संचालक, कबचौउमविशी संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था/मान्यताप्राप्त संशोधन केंद्र.
आपणास विनंती करण्यात येते की सदरचे परिपत्रक आपल्या संबंधित संशोधन केंद्रातील संशोधक मार्गदर्शक व पीएच.डी. अभ्यासक्रमास नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन देण्यात येवून उपरोक्त सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.
३. कबचौउमविशी संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्रांचे संशोधन सल्लागार समितीचे सदस्य.
४. संशोधन व मान्यता समिती, कबचौउमवि चे सन्माननिय सदस्य.
५. मा. आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय , ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य , पुणे.
६. मा. कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
७. मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

*talele sir bod minutes*

☎ (O) : 0257-2258409
(O) : 0257-2257221 & 2257222 & 224
Fax : (91)-0257-2258403 & 2258406
Website : www.nmu.ac.in
E-mail : pvcresearch@nmu.ac.in

(184)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# दिव्यांग कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे -४११ ००१.

ईमेल commissioner.disability@maharashtra.gov

दूरध्वनी क्र.०२०-२६१२२०६१ फॅक्स क्र.०२०-२६१११५९०

**महत्वाचे/तातडीचे**

जा.क्र.दिकआ/प्र-७/संशोधन समिती/२०२३/ 703 दि. ०३.२०२३. 09/03/2023

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon (Pro-V.C. Office)
12 APR 2023
INWARD No. : 2486

प्रति,

१.कुलगुरु, विदयापीठे ~~(सर्व)~~. North Maharashtra University, Jalgaon. 425001

२.निबंधक, विदयापीठ अनुदान आयोग,
पश्चिम विभागीय कार्यालय, पुणे.

३.निबंधक, भारतीय प्रोदयोगिक संस्था,पवई, मुंबई.

४.संचालक, अलियावर जंग नॅशनल इन्स्टिटयुट, मुंबई.

५.संचालक, बौध्दिक विकलांग नॅशनल इन्स्टिटयुट, रिजनल सेंटर , नवीमुंबई.

**विषय : दिव्यांगत्व विषयक करण्यांत येणा-या संशोधनासाठी दिव्यांग संशोधन समितीची पूर्व परवानगी घेणे विषयक.**

संदर्भ : दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम ६ मधील तरतूद.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यांत येते की, केंद्र शासनाने दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ हा कायदा पारीत केला असून सदर कायदा दिनांक १९.०४.२०१७ पासून अंमलात आला आहे. सदर कायदयातील तरतूदींची अंमलबजावणी करणे सर्व राज्यांना बंधनकारक आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ या कायदयातील प्रकरण क्रमांक २ मधील कलम ६ मधील मुददा क्रमांक २ नुसार prior permission of a Committee for Research on Disabilithy constituted in the prescribed manner for the purpose by the appropriate Government iun which not less than half of the Members shall themselves be either persons with disabilities or Members of the registered organization as defined under clauise (z) of section 2 याप्रमाणे तरतूद करण्यांत आली आहे.

त्यानुसार आपल्या अधिनस्त शैक्षणिक उपक्रमामधून जे संशोधक विदयार्थी दिव्यांगत्व विषयक संशोधनाचे प्रकल्पावर संशोधन करणार असतील तर त्यांचे संशोधनाच्या प्रकल्पास उक्त नमूद संशोधन समितीची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. त्यानुसार अध्यक्ष, दिव्यांगत्व विषयक संशोधन समिती तथा आयुक्त, दिव्यांग कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे दिव्यांगत्व विषयक संशोधन प्रकल्पासाठी पूर्वपरवानगी घेण्याचे प्रस्ताव सादर करावेत.

(ओमप्रकाश देशमुख भाप्रसे)
आयुक्त, दिव्यांग कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव कुलगुरु कार्यालय
12 APR 2023
896

PVC

14/4/23

प्रत :- मा.सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर.